अनुभव
हे ज्ञानाचे
सर्वोत्तम
शिक्षक
आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २७ जून २०२५ | अंक १९० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# जमीन मोजायला आले तर:मारु किंवा मरु
# शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचा संताप

नागपूर-गोवा शक्तिपीट महामार्ग प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सरकारने हा प्रकल्प राबवण्यास तब्बल 20 हजार 787 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सरकारच्या या निर्णयानंतर आता हा महामार्ग ज्या-ज्या जिल्ह्यांतून जात आहे, त्या भागातील शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. परभणी, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी प्रचंड आक्रमक झाले आहेत. नांदेडमध्ये शेतकऱ्यांनी या महामार्गाच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन केले आहे.आमच्या लेकरा बाळांना स्वप्न नाही का?नांदेडच्या मालेगाव येथे शेतकऱ्यांनी एकत्रित केले बोंबाबोंब आंदोलन आले. यावेळी शक्तीपीठ महामार्गाच्या अनुषंगाने काढलेल्या शासन निर्णयाची केली होळी करण्यात आली.




सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट, आमच्या लेकरा बाळांना ड्रीम नाहीत का? यावेळी शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. जमिनीची मोजणी करायला आलेल्या अधिकाऱ्यांना मारू नाही तर मरू असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतली.आमची वडिलोपार्जित

## आमची जमीन जात असेल तर...

कोणताही आमदार, खासदार आमच्यासोबत नाही. आम्ही किती बोंबललो तरी सरकार आमची बाजू घ्यायला तयार नाही. आमचा जीव घेतल्याशिवाय सरकारला रस्ता करता येणार नाही, अशी ठाम भूमिका गजानन तिमेवार या शेतकऱ्याने बोलून दाखवली. माझी 13 एकर शेती आहे. शक्तिपीठ महामार्गात नऊ एकर शेती जात आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात मी हिंदूंचा गब्बर आहे. सगळ्या हिंदूच्या जमिनी जात आहेत. आमची जमीन जात असेल तर आम्ही आमच्या गोमाता कुठे न्यायच्या? असा सवाल प्रमोद इंगोले या शेतकऱ्याने केला.

जमीन जात असेल तर...महामार्गाचे विरोधात शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष पाहायला मिळत आहे. आज (25 जून) नांदेड, परभणी व हिंगोली येथील शक्तिपीठ महामार्गबाधित शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बैठक घेतली. बैठकीनंतर सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून शक्तीपीठ महामार्गाच्या अनुषंगाने काढलेल्या शासनाने निर्णयाची शेतकऱ्यांनी होळी केली. आमची वडिलोपार्जित जमीन जात असेल तर आम्हाला हा शक्तिपीठ मार्ग काय कामाचा? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

# दुचाकी चालवताना हेल्मेट वापरण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

बीड, दि.२५ : जिल्हयातील सर्व नागरिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदीनुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक आहे. याबाबत वेळोवेळी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट सक्तीचे आहे, असे निर्णय दिलेले आहेत.जिल्ह्यात सन २०२४ मध्ये रस्ता अपघातामधील मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू दुचाकीस्वार यांचे झालेले आहेत. यामध्ये ६० % पेक्षा जास्त अपघात मृत्यू हेल्मेट परिधान न करता गाडी चालविल्यामुळे झालेले दिसून येत आहेत. जिल्ह्याच्या विकासात प्रशासनाची भूमिका महत्वाची आहे. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी हे प्रशासनाचा कणा समजण्यात येतात. शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे वर्तन समाजासाठी नेहमीच अनुकरणीय असे आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना, सार्वजनिक रस्त्यावर वावरताना

हेल्मेट परिधान केल्यास सर्व नागरिकांमध्ये हेल्मेट परिधान करण्याबाबत जनजागृती होते. त्यामुळे वाहनधारक स्वयंप्रेरणेने हेल्मेट वापरण्यासाठी प्रवृत्त होतात. जिल्हयातील सर्व शासकीय आस्थापना, महामंडळे, महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद येथील अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहनाने शासकीय कार्यालयात येताना, रस्त्यावर दुचाकी वाहन चालवताना

हेल्मेटचा वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांना दिले आहेत.

# खासगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रारी समितीची स्थापना करण्याचे आवाहन

बीड, दि.२५ : कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम २०१३ ची प्रभावी अंमलबजावणी सर्व खासगी आस्थापनांनी करावी. त्याचबरोबर अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी विहित कार्यपद्धतीनुसार करण्याचे आवाहन जिल्हा व महिला बालविकास अधिकारी एफ.एम. शेख यांनी केले आहे.खासगी कार्यालयामध्ये दहा किंवा दहापेक्षा जास्त कर्मचारी असतील, अशा सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी SHE BOX PORTAL वर करण्यासाठी केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत. सर्व खासगी आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार समिती गठीत करावी व SHE BOX PORTAL वर सर्व खासगी आस्थापनांची नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे, असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद आहे. समिती नोंदविण्याची कार्यपद्धती अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्यासाठी htt{s://shebox. wcd.gov.in या संकेतस्थळावर जाऊन होम स्क्रीनवर दाखविल्याप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती नोंदवा (Private Head office Registration) या टॅबवर उश्रळलज्ञ करा. आवश्यक त्या सर्व माहितीचा तपशील भरून डीलाळीं या ढरल वर उश्रळलज्ञ करून अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदवा.

# फळपीक विमा भरण्याची अंतिम मुदत ३० जूनपर्यंत

बीड, दि.२५:- पुनर्रचित हवामान आधारित फळिपक विमा योजना मृगबहार २०२५ मधील पेरू, संत्रा, लिंबू या पिकांना भाग घेण्याची अंतिम मुदत ३० जून, २०२५ पर्यंत आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी कळवले अआहे. पुनर्रचित हवामान आधारित फळिपक विमा योजना राज्यात मृग व आंबिया बहार मध्ये राबविण्यात येते. मृग बहार मध्ये संत्रा, पेरू, लिंबू, द्राक्ष या पिकांसाठी भाग घेण्याचा अंतिम दिनांक १४ जून २०२५ होता. विमा योजनेत भाग घेण्यासाठी काही तांत्रिक अडचणीमुळे पीक विमा पोर्टल www.{mfby.gov.in १३ जून २०२५ रोजी सुरू झाले. वरील चारही पिकांना भाग घेण्यासाठी अतिशय अल्प कालावधी मिळाला. त्यामुळे हा कालावधी वाढवण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास केंद्र शासनाने अनुमती दिली. तरी पेरू, लिंबू, द्राक्ष, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी याची नोंद घेऊन विमा योजनेत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री. साळवे यांनी केले आहे.

*****

# दहावी, बारावी परीक्षा केंद्र परिसरात मनाई आदेश

बीड, दि.२५ : जिल्ह्यामध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून-जुलै-२०२५ आयोजित केल्या आहेत. बारावीची १६ जुलैपर्यंत आणि दहावी ८ जुलैपर्यंत परीक्षा आहे. या परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात व परीक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी, अनाधिकृत कृत्य होऊ नये याकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये म




नाई आदेश लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना आदेश लागू राहणार नाहीत. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक इ. परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदरपासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे. शासकीय व परीक्षेसंबंधित कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद आहे.

बीड जिल्हयाच्या हद्दीतील परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी ०८ जुलैपर्यंतच्या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परीक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी आदेश लागू राहतील, असेही आदेशात नमूद आहे.

### पाटोदा तालुका शिवसैनिकांची जिल्हाप्रमुखवानी घेतली बैठक

# पाटोदा अल्पसंख्यांक तालुका प्रमुख पदी शेख असिफ यांची निवड



पाटोदा : (प्रतिनिधी) आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थेच्या प्रमुख निवडणूकीच्या अनुषंगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्ष बांधनीचे काम जिल्हाप्रमुख उल्हास गिराम करत आहेत. आज पाटोदा येथील शासकीय विश्राम गृहावर तालुक्यातील शिवसैनिकांची बैठक घेऊन शेख असिफ सहेबलाल यांची अल्पसंख्यांक तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली.

जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणूकी संदर्भात गट - गण निहाय चर्चा या बैठकी झाली. शिवसैनिकांनी तयारीस लागावे, पक्ष बांधनी, पक्ष संघटन यावर भर घालण्यासाठी जिल्हाप्रमुख आग्रही होते. यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह, जिल्हा सामन्वयक संजय महाद्वार, युवा सेना जिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, शिवसेना पाटोदा तालुका प्रमुख

मुकुंद शिंदे, युवासेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा चोरे, युवासेना तालुका प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ लवुल, तालुका सम्वयक आकाश कांकरिया, विशाल शिंदे, अजित अडगले, योगेश शिंदे आदी शिवसैनिक मोठया प्रमाणावर या बैठकीत उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र देऊळगाव कुंडपाळ ते श्रीक्षेत्र पंढरपुर जाणाऱ्या पायी दिंडीचे तेलगावात स्वागत

वडवणी (प्रतिनिधी): आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र देऊळगाव कु ंडपाळ ते श्रीक्षेत्र पंढरपुर पायी दिंडी तेलगावात आली असता या दिंडीचे विविध ठिकाणी स्वागत करून दिंडीतील सहभागी वारकऱ्यांना चहा,नाष्टा व जेवनाची केली जाते.प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र देऊळगाव कु ंडपाळ येथील श्री.साखरतळे देवी संस्थानचे ह.भ.प. मठाधिपती प.पु श्री. १००८ स्वामी साधन चैतन्यजी महाराज यांच्या आशिर्वादाने व दिंडी चालक ह.भ.प. व्यवस्था करून,वारकऱ्यांची सेवा करण्यात आली. श्रीक्षेत्र देऊळगाव कु ंडपाळ ता.लोणार येथील श्री साखरतळे देवी संस्थानच्या गेल्या एक तपा पासुन आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र देऊळगाव कुंडपाळ ते श्रीक्षेत्र पंढरपुर पायी दिंडी काढण्यात येते.या दिंडीतील सहभागी वारकऱ्यांचे तेलगाव ता.धारूर येथे विविध ठिकाणी जंगी स्वागत करून त्यांना चहा,नाष्टा व जेवनाची व्यवस्था स्तुती कोटेचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान बीड (प्रतिनिधी): स्तुती सुयोग कोटेचाने लंडन अबॅकस ओलंपियाड मध्ये जागतिक स्तरावर सर्व द्वितीय युरो कॅश प्राईस, सन्मानपत्र मिळवून नाव लौकिक मिळवला आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो असे माननीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले आहे आणि स्तुती कोटेच्या सर्वांगीण विकासामध्ये अबॅकस गणितीय पद्धत अतिशय महत्त्वाची ठरलेली आहे. शहरातील अबॅकस ट्र ेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. यु एस अबॅकस असोसिएशन , तैवान चेंबर्स ऑफ कॉमर्स, पेमा इंटरनॅशनल अबॅकस असोसिएशन, सौरबन अबॅकस असोसिएशन ओसाका , स्किल डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप आणि आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन बीड मधील एम सी पी आय अबॅकस आणि वेदिक मॅथ सेंटर सदस्यत्व सहकार्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील लंडन अबॅकस ओलंपियाड स्पर्धा मे महिना २०२५ रोजी जाहीर झालेल्या निकाला



प्रमाणे अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिना निमित्त जनजागृती शिबीर संपन्न भागवताचार्य माधव महाराज नागरे यांच्या नेतृत्वाखाली व जीवनभाऊ डव्हळे यांच्यासह इतर वारकरी मंडळीच्या सहकार्याने दि.१८/०६/२०२५ रोजी श्रीक्षेत्र देऊळगाव कुंडपाळ येथुन पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपुरच्या दिशेने प्रस्थान झाले असुन, सदर दिंडी दि.०४/०७/२०२५ रोजी श्रीक्षेत्र पंढरपुर येथे मुक्कामी पोहचणार आहे.सदरील दिंडी दि.२४ रोजी सायंकाळी तेलगाव मुक्कामी आली असता येथील सुरजप्रकाश कलंत्री,सुलेख कलंत्री, सुनिल कलंत्री या परिवाराच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. तर दुसर्या दिवशी दि.२५ रोजी सकाळी पत्रकार बालाप्रसाद जाजु,व जाजु परिवाराच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांच्या चहा नाष्ट्याची व्यवस्था करून सेवा करण्यात आली.तसेच राम पांचाळ यांनी ही या दिंडीतील वारकऱ्यांची नाष्ट्याची सेवा केली. दि.२५ रोजी सकाळी गावातील हनुमान मंदिरात जाजु परिवाराने आयोजित केलेल्या सेवाचा वारकऱ्यांनी लाभ घेऊन, नंतर भक्तीभावे श्री ची आरती केली.यावेळी गावातील महिला पुरूषांसह भक्त उपस्थित होते.त्यानंतर भक्तिमय वातावरणात दिंडीने श्रीक्षेत्र पंढरपुरच्या दिशेने प्रस्थान केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २७ जून २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

### पहिलीपासून हिंदी शिकविण्याच्या धोरणाला राज्यातून विरोध

पहिलीपासून त्रिभाषा सूत्र राबविण्यामागून सरकार एक पाऊल मागे हटल्याचे यातून दिसते. मात्र, तसे ठोसपणे म्हणता येणार नाही; कारण गेल्या वर्षभरापासून धोरणात्मक स्तरावर असलेल्या या मुद्द्यावरून विरोधानंतरही सरकार पूर्णपणे मागे हटलेले नाही. पहिलीपासून हिंदी शिकविण्याच्या धोरणाला राज्यातून सर्व स्तरांतून कडाडून विरोध झाला. हा विरोध केवळ हिंदीच्या द्वेषातून किंवा मराठी भाषेची अस्मिता धारदार करण्यातून झाला नव्हता; तर शिक्षणशास्त्राच्या आणि बालमानसशास्त्राच्या दृष्टिकोनातूनही होता. लहान वयात मुले अनेक भाषा शिकतात हे खरे असले, तरी औपचारिक पद्धतीने त्यांच्यावर तीन भाषा शिकण्याचे ओझे लादणे शिक्षणशास्त्राला धरून नाही. मात्र, यानंतरही सरकार त्रिभाषा सूत्रावर ठाम राहिले. तिसरी भाषा म्हणून हिंदीच का, हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर अन्य भाषांचा पर्याय देण्याचे आश्वासन खुद्द मुख्यमंत्र्यांनी दिले. त्याची अंमलबजावणी झाली; परंतु अन्य भाषा निवडण्यासाठी वीस विद्यार्थी एकत्र असण्याची अट घातली गेली. अनेक ठिकाणी हे शक्य नसल्याने एक प्रकारे हिंदीची सक्ती कायम ठेवली गेली. त्याला पुन्हा एकदा जोरदार विरोध होऊ लागल्यावर सुरुवातीला हिंदी लादली नसल्याचे स्पष्टीकरण दिले गेले. हा मुद्दा ताणला जात असल्याचा आरोपही केला गेला. मात्र, विरोधाला धार चढताना दिसल्यावर सोमवारी अखेर बैठक घेतली गेली आणि चर्चेअंती निर्णय घेण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. अशा महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणे केव्हाही स्वागतार्ह. मात्र, चर्चेसाठी सरकार कोणाला बोलावणार हा प्रश्न आहे. पहिलीपासून त्रिभाषा राबविण्याच्या धोरणाला अनुकूल असणाऱ्यांनाच चर्चेला बोलाविल्यास वेगळा निर्णय होण्याची शक्यता कमी होते. फार तर हिंदीला पर्यायी भाषेसाठी विद्यार्थ्यांच्या संख्येची अट शिथिल होऊ शकते. मात्र, यामुळे पहिलीपासून त्रिभाषा सूत्र कायम राहील. या धोरणाचा खऱ्या अर्थाने फेरविचार करायचा असेल, तर सर्व संबंधित घटकांच्या प्रतिनिधींशी म्हणजेच भाषाअभ्यासक, शिक्षणशास्त्राचे अभ्यासक, बालमानसशास्त्रज्ञ, पालकांचे प्रतिनिधी आदी सर्वांशी चर्चा व्हायला हवी. त्याचबरोबर पहिलीपासून तीन भाषा शिकविणे खरोखरीच गरजेचे आहे काय, यावरही विचार व्हायला हवा. राज्यात मराठी आणि इंग्लिश ही माध्यमे सोडून अन्य माध्यमांतील म्हणजे उर्दू, हिंदी, कन्नड, गुजराती आदी माध्यमांतील विद्यार्थ्यांना पहिलीपासून त्यांच्या माध्यमाची भाषा, इंग्लिश आणि मराठी या तीन भाषा शिकायला मिळतात हे खरे. मात्र, मराठी आणि इंग्लिश माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. नव्वद टक्के विद्यार्थी या दोन माध्यमांमधील आहेत. त्यामुळे अन्य माध्यमांच्या विद्यार्थ्यांचे श्रेयांक (क्रेडिट पॉइंट्स) वाढतील आणि मराठी व इंग्लिश माध्यमांची मुले श्रेयांकाच्या बाबतीत मागे पडतील, या युक्तिवादाला फार अर्थ नाही. प्राथमिक स्तरावर अनौपचारिक शिक्षण महत्त्वपूर्ण ठरते. त्यामधील उपक्रमांचे श्रेयांकात रूपांतर करण्याची व्यवस्था करता येऊ शकते. नवीन शैक्षणिक धोरणात (एनईपी) त्रिभाषा सूत्राचा उल्लेख असला, तरी ते माध्यमिक स्तरापासून राबविण्याची शिफारस आहे; शिवाय त्यात हिंदीचा उल्लेखही नाही. ‘एनईपी’ची राज्यात अंमलबजावणी करताना त्यात बदल अपेक्षित असले, तरी त्रिभाषा सूत्राच्या बाबतीत बदल न करणेच योग्य ठरेल. मराठी आणि इंग्लिश माध्यमांच्या शाळांत पहिली ते पाचवी या इयत्तांत फक्त मराठी आणि इंग्लिश याच दोन भाषा शिकवाव्यात. सहावीनंतर तिसरी भाषा कोणती घ्यायची याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिले जावे. हिंदीच्या सक्तीला राज्यात होत असलेला विरोध सत्ताधाऱ्यांनी समजून घ्यायला हवा. मराठीला अभिजात दर्जा वगैरे मिळाला असला, तरी केवळ मुंबईतच नव्हे, तर राज्यातील अन्य शहरांतही हिंदीचे वर्चस्व वाढले आहे. ती सार्वजनिक ठिकाणी संभाषणाची अनौपचारिक भाषा बनली आहे. हिंदी चित्रपटांपासून क्रिकेटच्या समालोचनांपर्यंत विविध माध्यमांतून हिंदी सर्वसामान्यांच्या कानावर आदळत असतेच. त्या तुलनेत मराठीचा प्रसार नाही. मराठी अद्याप पूर्णपणे ज्ञानभाषा बनलेली नाही; आणि बाजारपेठेची भाषाही नाही. या पार्श्वभूमीवर हिंदीचा वाढता प्रचार मराठी भाषकांसाठी चिंताजनक ठरू शकतो. हिंदीला महाराष्ट्राने कधीच विरोध केलेला नाही. मात्र, तिच्यासाठीच्या पायघड्या मराठीच्या मुळावर येण्याची भीती आहे

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा

## चालू कामांबाबत केले समाधान व्यक्त

### उर्वरीत कामांचा पाठपुरावा करण्याचे प्रशासनाला निर्देश

बीड, दि.२६ : बीड जिल्ह्यात नियोजित विमानतळासाठी जमीन देणे, मोजणी करणे, परळी येथे पशुवैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी, परळी-अहिल्यानगर रेल्वेमार्ग आणि जिल्ह्यातील विविध विकास कामांचा आढावा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्हीसीद्वारे दिनांक २५ जून रोजी घेतला. जिल्ह्यात चालू असलेल्या या कामांच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करून उर्वरीत कामाबाबत पाठपुरावा करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी प्रशासनाला दिले.

या बैठकीसाठी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव राजेश देशमुख, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी जिल्ह्यामध्ये चालू असलेल्या महत्त्वाच्या कामांची सद्यस्थिती नमूद केली.

बीड येथील नियोजित विमानतळासाठी मौजे कामखेडा, दगडीशहाजानपूर व आहेर चिंचोली या गावातील ११७.०४ हेक्टर शासकीय जमीन व १९१.२८ हेक्टर खासगी अशी एकूण ३०८.३२ हेक्टर जमीन प्रस्तावित करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी बीड यांनी या जागेची पाहणी केली आहे.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्रीमती स्वाती पांडे यांनी ही जागा विमानतळासाठी सुयोग्य आहे का, हे तपासण्यासाठी (Pre-feasibility S>tudy) जिल्हा प्रशासनाकडून प्रपत्र -१ मध्ये माहिती मागवून घेतली आहे. तसेच याबाबतच्या तपासणीसाठी जिल्हा प्रशासनाकडे रुपये ४०.३२ लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत परळी (वै.) येथे पशुवैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी होत आहे. या महाविद्यालयासाठी मौजे लोणी तालुका परळी येथे ८.८० हेक्टर व परळी येथे २० हेक्टर अशी २८.८० हेक्टर जमीन प्रदान करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या जागेची पाहणी पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी यांनी केली आहे. तसेच ही जमीन प्रदान करण्यासाठी आवश्यक असणारे ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अभिप्रायसुद्धा शासनाकडे सादर करण्यात आले आहे. ही जमीन विद्यापीठाकडे वर्ग झाल्यानंतर सदरील ठिकाणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी सुरू होईल.

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामांमध्ये प्रामुख्याने रेल्वे विभागाकडून माजलगाव, बीड व परळी उपविभागामध्ये एकूण १३ गावांमध्ये नव्याने राहिलेल्या क्षेत्राचे भूसंपादनाचे प्रस्तावांतर्गत संयुक्त मोजणीच्या तारखा जून महिन्याच्या शेवटच्या व जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निश्चित करण्यात आल्या असल्याचे जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी नमूद केले. त्या अनुषंगाने सदर मोजणीची कार्यवाही नेमलेल्या तारखेस पूर्ण करावी व त्यानंतर अंतिम निवाड्याची कार्यवाही जलद गतीने पूर्ण करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनास केल्या. सदर रेल्वे मार्ग कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने ट्रॅक्शन सबस्टेशन आष्टी येथील कामाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये सदर रेल्वे लाईनवरील २३ पैकी १७ मनोऱ्यांचे काम महापारेषणमार्फत करण्यात आले आहे, उर्वरित ४ मनोऱ्यांचे काम प्रगतीपथावर असून १५ जुलैपर्यंत सदर काम पूर्ण करण्यात येणार आहे, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

*****

# पोलीस निरीक्षक पवार यांच्या हस्ते पुजा करून वारकर्यांना अल्पोपहार व महाप्रसादाचे वाटप

बीड /प्रतिनिधी श्रीसंत मुक्ताईंची पालखी मुक्ताईनगर येथून पंढरपूर कडे रवाना होत असताना दोन दिवसांसाठी बीड शहरात मुक्कामी असते, यावेळी बीड शहरातील भाविक मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत करत वारकरी बांधवांच्या सेवेतच विठ्ठलाचे दर्शन करत असतात. बीड शहरातुन पंढरपुरकडे प्रस्थान करते वेळी सामाजिक क्षेत्रातील संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने पालखीचे हर्षोल्लासात मध्यवर्ती बसस्थानक समोर स्वागत करण्यात आले. हा पालखी सोहळा शहरातील माळीवेस चौक, सुभाष रोड, बसस्थानकमार्गे वारकरी दिंड्या, पताका, ध्वजकरी, विठू रायाचे




नामस्मरण करीत कपिलधार येथील मंदिरात मुक्कामी जातात. यावेळी वारकर्यांना संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने बस स्थानक समोर हॉटेल अन्नपूर्णा येथे फराळाचे वाटप करण्याची परंपरा गेल्या १० वर्षी पासुन अवितरपणे चालू आहे. याहीवर्षी शिवाजीनगर पोलिस निरीक्षक श्री. किशोर पवार साहेब यांच्या हस्ते पुजा करून अल्पोपहार वाटप करण्यात आला आहे, यावेळी पालखी सोहळ्याचे संस्थानप्रमुख ऍड. रविंद्र पाटील, दिंडीचे प्रमुख हरणे पाटील, महंत श्री. अमृताश्रम महाराज, पोलीस निरीक्षक श्री. पवार साहेब, किशनसिंग चौहान यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदरयुक्त सत्कार प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आला. श्रीसंत मुक्ताईंच्या पालखीची महाआरती प्रतिष्ठानचे प्रमुख संतोष मेहता,प्रशांत डोरले, तिलक झाडीवाले यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकर्याला फराळ म्हणून केळी, चिवडा, राजगीरा लाडू, चिप्स असे विविध फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी शहरातील नागरिक व सर्व व्यापारी सह प्रतिष्ठानचे सदस्य कृष्णा जाधव, बाबासाहेब वणवे, रवी देवकर, करण पाबळे, जयराज जाधव, हर्षवर्धन पाटील, प्रवीण मते, आदित्य नवले, वैभव काळे, श्रेय जैन, यशराज जाधव, देवेश जैन सह अन्य सहकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# मराठा आरक्षण: खा.सोनवणेंनी घेतली जरांगे पाटलांची भेट

## आरक्षण लढ्यासंदर्भात चर्चा

बीड: मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी दि.१ ऑगस्टपर्यंत मागण्या मान्य करा अन्यथा दि.२९ ऑगस्टला मुंबईत आंदोलन करण्याची भूमिका घेतली असून या पार्श्वभुमीवर खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२५ जून रोजी सायंकाळी अंतरवाली सराटी येथे जावून मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षण आंदोलनावर दोघात सविस्तर चर्चाही झाली.या प्रसंगी माजी मंत्री राजेश टोपे व माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहन जगताप हे उपस्थित होते. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश तात्काळ लागू करावा, हैद्राबाद, सातारा व बॉम्बे गॅझेटियर लागू करून त्यावर अंमलबजावणी करावी, ‘सगे-सोयरे’अधिसूचनेची तात्काळ अंमलबजावणी करावी, मराठा आरक्षणातील आंदोलकांवरील दाखल गुन्हे मागे घ्यावेत, मराठा आंदोलनातील बलिदान दिलेल्या कुटुंबांना नोकरी व आर्थिक मदत द्यावी, न्या.शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, संतोष अण्णा देशमुख हत्या आणि कोपर्डी प्रकरणातील आरोपींना फाशी देण्यात यावी. जर हे निर्णय १ ऑगस्ट २०२५ पर्यंत घेण्यात आले नाहीत, तर २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत मोठे आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा या पत्रात देण्यात आला आहे. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी मराठा समाजाच्या सर्व न्याय्य मागण्यांचे निवेदन योग्य त्या पातळीवर पोहोचवण्याचा प्रयत्न आपण करू, असेही यावेळी म्हटले आहे. मराठा आरक्षण लढ्यात आपण सोबत असून मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी लढत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी संपुर्ण मराठा समाज ताकतीने उभा असल्याचा विश्वासही यावेळी त्यांनी दिला.



# समतेचा दीपस्तंभ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज

१५१ व्या जयंतीनिमित्त विशेष "समता, बंधुता आणि न्याय हीच खरी राजधर्माची खरी व्याख्या आहे," हे सांगणारा आणि प्रत्यक्ष कृतीतून दाखवणारा राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज. आज, २६ जून २०२५ रोजी, त्यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त त्यांना प्रजा-शासन परिवाराकडून विनम्र अभिवादन! एक परिवर्तनकारी युगाचा आरंभ छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. कोल्हापूरच्या गादीवर त्यांनी १८९४ मध्ये कारभार हाती घेतला आणि १९२२ पर्यंत आपला सारा कारभार समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या पुनरुत्थानासाठी समर्पित केला. ते फक्त एक राजा नव्हते; ते समाजसुधारणेचे ज्वलंत प्रतीक होते. शिक्षण हेच खरे स्वातंत्र्य शाहू महाराजांना सामाजिक परिवर्तनाचा खरा पाया शिक्षण यामध्ये दिसला. त्यावेळी बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. शाहू महाराजांनी पहिल्यांदा शालेय शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. त्यांनी दलित आणि मागासवर्गीय मुलांसाठी वसतिगृहे स्थापन केली. हे वसतिगृहे केवळ निवासाची सोय नव्हती, ती एक क्रांतीची पाळणघरे होती. त्यांनी मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले, विधवांकरिता शाळा उघडल्या, अंध व अनाथ मुलांसाठीही शैक्षणिक संधी निर्माण केल्या. आज जे "समावेशक शिक्षण" हा आधुनिक संकल्प मानतो, तो शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी कृतीत उतरवला होता. आरक्षणाचा पाया १९०२ मध्ये त्यांनी सरकारी नोकरभरतीत मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्षण लागू करून दिले. ही कृती त्या काळच्या उच्चवर्णीय व्यवस्थेला हादरवणारी होती. पण शाहू महाराजांना जनतेच्या भल्यापलीकडे काहीही दिसत नव्हते. हा निर्णय आज आपण ज्या घटकांना घटनात्मक आरक्षणाच्या आधारे शिक्षण व नोकरी मिळवताना पाहतो, त्यांची सुरुवात याच ऐतिहासिक निर्णयातून झाली होती. समाजप्रबोधन व लोकशाही विचारांची पायाभरणी शाहू महाराजांनी केवळ शिक्षण किंवा सरकारी योजना राबवल्या नाहीत, तर सामाजिक समतेचा विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी माध्यमांचा वापर केला. "सुधारक", "दीनबंधू" यांसारख्या साप्ताहिकांचे प्रोत्साहन, ब्राह्मणेतर परिषदेसारख्या संस्थांची स्थापना, वंचितांसाठी धर्मस्वातंत्र्य, नवा आचारधर्म निर्माण करण्याचा प्रयत्न हे सारे त्या काळातील एक विवेकाधिष्ठित राज्यकर्त्याचे दर्शन घडवतात. अस्पृश्यता निर्मूलन – प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी गंगाराम कांबळे यांना "सुधारक" हॉटेल चालवण्याची परवानगी दिली आणि स्वतः त्या हॉटेलमध्ये जाऊन चहा प्यायला सुरुवात केली. ही केवळ कृती नव्हती, ती एक सत्तेने समाजाला दिलेली साक्षात समतेची शिकवण होती. आजच्या संदर्भात शाहू महाराज किती महत्त्वाचे? आजही समाजात विषमता, जातीवर आधारित अन्याय, शिक्षणात असमान संधी, महिलांविरोधातील अन्याय असे अनेक प्रश्न उभे आहेत.



राजे शिवछत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना भारतीय जनता पक्षाचे जिह्ला उपाध्यक्ष तथा माजी नगरपालिका सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील विष्णु महाराज सुरवसे इत्यादी



गेवराई - शहरातील मतिमंद निवासी विद्यालय , गेवराई येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# सरपंच प्रभाकर कवठेकर यांनी जि.प.निवडणुकीसाठी पुढे यावं ; सर्वसामान्य जनता सर्व ताकतीने सोबत!

## दूरदृष्टी असलेला नेता सरपंच प्रभाकर कवठेकर आम्हाला जिल्हा परिषद मध्ये हवाय!



पाटोदा | प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका अगदी जवळ आल्या आहेत. या निवडणुकीमध्ये सर्वसामान्य जनता आपला उमेदवार हा पारखून निवडून देणार आहे यात शंका नाही. आम्हाला हक्काचा आणि विश्वासाचा दूरदृष्टी असलेला नेता हवाय अशा मागण्या सूर जनतेमधून निघत आहेत. डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटामधून दूरदृष्टी असलेला नेता म्हणून सध्या सरपंच प्रभाकर कवठेकर यांच्याकडे पाहिलं जात असून त्यांनी ग्रामपंचायत अंतर्गत केलेला विकास हा सर्वसामान्य जनतेच्या हिताचा आणि दूरदृष्टी ठेवून केलेला असल्याने जनतेने त्यांना निवडणुकीसाठी पुढे यावं जनता तुमच्या सोबत आहे असं आव्हान केला आहे..पिठी ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या विविध विकास कामातून जनतेला विश्वासात घेऊन आजपर्यंत केलेलं काम हे खूप मोठा आहे. सरपंच पदावर असताना केलेले विकासकाम जनतेच्या मनात रुजले आहेत. अशीच काम संपूर्ण जिल्हा परिषद गटांमध्ये झाली तर जनतेचे सर्व प्रश्न सुटतील असा सर्वसामान्य जनतेला असल्याने जनतेने आता सरपंच प्रभाकर कवठेकर यांना जिल्हा परिषद निवडणुकीत उभे राहण्याचे आव्हान विनंती करून निवडून आणण्याची जबाबदारी सर्वसामान्य जनता घ्यायला तयार आहे असं सुद्धा बोलले जात आहे.

दूरदृष्टी असणारा नेता आम्हाला हवा! सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी दूरदृष्टी असणाऱ्या नेता जर मिळाला तर सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सर्व सुटतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेला असल्याने पिठी गावचे सरपंच प्रभाकर कवठेकर यांच्या रूपान जिल्हा परिषद गटाला जर असा दूरदृष्टीचा नेता मिळाला तर सर्वसामान्य जनतेचे सर्व प्रश्न सुटतील असा विश्वास असल्याने गटातील सर्व ठिकाणी त्यांच्या नावाची चर्चा जोरदार सुरु झाली आहे.

## बीड मार्गे पिंपळनेर ,देवडी, काडीवडगाव ,देवगाव लऊळ व पात्रुड माजलगाव नवीन एसटी सेवा सुरू करा ,

# बीडच्या आगार व्यवस्थापकांना युवकांचे निवेदन



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी गेल्या अनेक वर्षापासून असलेली एसटी सेवा बीड मार्गे पिंपळनेर - देवडी - काडीवडगाव - देवगाव - लवूळ क्र. १ - पात्रुड ते माजलगाव नवीन एसटी सुरू करणे बाबत. उपरोक्त विषयी आपल्या सेवेत निवेदन सादर करतो की, बीड - पिंपळनेर - देवडी मार्गे माजलगाव पर्यंत नवीन रस्ता झाला असून सदर रस्त्याला अंतरवन पिंपरी तांडा, म्हसापूर, जवळा, इट, सांडरवन, पाटेगाव, नबापूर, बोरदेवी, सुरडी, मोरेवाडी, कवडगाव, पिंपरखेड, देवडी, काडीवडगाव, चिंचवडगाव, देवगाव, लऊळ क्र. २, खापरवाडी, परडी, माटेगाव, केंडे पिंपरी, पुनंदगाव, धानोरा, लवूळ क्र. १, पात्रुड, पात्रुड कॅम्प, ढोरगाव अशी 27 ते 30 गाव आहेत ; अशी सदर रस्त्याला लागून जवळपास लाखभर लोकसंख्या आहे. जिल्हास्तरावर विविध कामांसाठी नागरिकांना प्रवास करावा लागतो परंतु सदर प्रवास अर्ध्यापेक्षा जास्त गावांना वडवणी किंवा तेलगाव मार्गे करावा लागतो. बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असून माजलगाव हे अर्ध्या गावांसाठी उपविभागीय शहर आहे त्यामुळे माजलगाव आणि बीड या दोन्ही शहरांमध्ये वरील ग्रामीण भागातून दैनंदिन शैक्षणिक, वैद्यकीय, कार्यालयीन, खरेदी - विक्री इत्यादी कामांसाठी ये जा करणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय आहे. वरील बाबी, नागरिकांची गरज व सुव्यवस्थित रस्त्याची उपलब्धता पाहता, आपल्या आगाराने बीड माजलगाव एसटी सेवा पिंपळनेर मार्गे चालू केली तर नागरिकांची दैनंदिन दळणवळणाची हक्काची सोय होईल व आपल्या आगाराचे उत्पन्न वाढीस मदत होऊन इतर मार्गाने आज जे नागरिक प्रवास करीत आहेत त्यांची. देखील बचत होईल तरी माननीय साहेबांना विनंती आहे की वरील गावांची गरज पाहता आपण बीड माजलगाव एसटी बस सेवा पिंपळनेर देवडी मार्गे चालू करावी. अशी निवेदनाद्वारे मागणी शेतकरी नेते जगदीश फरताडे, राजेभाऊ बादाडे, राहुल सुरवसे, गितेश आगे आदी उपस्थित होते

## उमापुर येथे माध्यमिक विद्यालयात माता–पालक मेळावा उत्साहात संपन्न

# विद्यार्थ्यांना शालेय गणवेशासह शैक्षणिक साहित्यांचे वाटप




गेवराई : जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय उमापुर येथे शारदा स्पोर्ट्स अकॅडम ीचे अध्यक्ष तथा युवा नेते रणवीर अमरसिंह पंडित यांच्या प्रेरणेने बुधवार दि.२५ जुन २०२५ रोजी विद्यार्थांसाठी चर्चा सत्र तसेच माता-पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज पौळ, तर प्रमुख पाहुणे म्हणून गावातील प्रतिष्ठित नागरीक तसेच शाळेतील सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या माता - पालक मेळाव्यास पालकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदवला होता. गेवराई तालुक्यातील उमापूर येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , उम ापुर येथे शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज पौळ यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबत तसेच गुणवत्तेबाबत माता पालकांशी सुसंवाद साधण्यात आला. आपल्या पाल्याच्या शैक्षणिक अडचणी सोडविण्यासाठी पालकांनी सहकार्य करावे ही अपेक्षा व्यक्त करुन मुख्याध्यापक भक्तराज पौळ यांनी माता - पालकांशी संवाद साधत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच अविनाश ख्रिस्ती , सुरेश भोसले ,प्रशांत जाधव ,कैलास वीर , कृष्णा सामसे ,कृष्णा धापसे, बालाजी गिरी, पिंगळे ज्ञानेश्वर, मतीन कुरेशी, सचिन भोसले, परमेश्वर कातकडे ,पांडुरंग देशमुख, हरिचंद्र वीर ,फडतळे दिलीप, भाऊसाहेब कापसे, बळीराम पाटोळे, नितीन आहेर, गोरख राठोड ,विठ्ठल जाधव ,शिवाजीराव कापसे, लक्ष्मण कापसे ,चव्हाण मच्छिंद्र, विलास औटी, ज्ञानेश्वर हिंगे, सविता गिरी, रोहिणी धापसे, तसलीम कुरेशी, गीता वीर, कविता कापसे, सुनीता पाटोळे, जाधव नीता, सुरेखा कातकडे, मंगल वीर, अश्विनी वीर ,उषा आहेर ,मनीषा शेळके, सुजाता जाधव, मंगल वीर ,अश्विनी वीर ,कावेरी वीर ,योगिता आहेर ,सीता वीर ,नीलमबाई चव्हाण, सोनू कापसे, प्रिया हिंगे यांच्या सह माता-पालक यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# ट्रेनी शिक्षकांचे थकीत वेतन देवून १ जुलै पासून रि–जॉइनिंग करा

## ट्रेनी शिक्षकांची जिल्हा कौशल्य विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांनी सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असून त्यांचे माहे–जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांचे विद्यावेतन मि ळालेले नाही तरी कौशल्य विभाग ,बीड यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थ्यांच्या खात्यावर तात्काळ वेतन जमा करुन त्यांची दि.०१ जुलै २०२५ पासून पुढील पाच महिन्यांकरिता रि–जॉइनिंग करण्यात यावी नसता दि.०२ जुलै २०२५ पासून बेमुदत उपोषण करण्यात असे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण संघटना,बीड जिल्हा यांच्या वतीने सहाय्यक आयुक्त उचले, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता म ार्गदर्शन केंद्र, बीड यांना निवेदनाद्वारे कळिवण्यात आले आहे.

बीड जिल्हा मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण ट्रेनी शिक्षक संघटनेच्या वतीने श्रीसंत सयाजी बागडे महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, संचलित श्रीसंत बागडेबाबा मानव मित्र संघटना या संघटनेच्या वतीने गुरुवार ,दि.२६ जुलै रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांनी सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असून माहे जानेवारी व फेब्रुवारी या महिन्याचे प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांना विद्यावेतन मिळालेले नाही. तरी कौशल्य विभाग बीड यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थ्यांच्या खात्यावर तात्काळ विद्यावेतन जमा करुन दि.०१ जुलै २०२५ पासून पुढील पाच महिन्यांसाठी ट्रेनी शिक्षकांची ऑनलाइन रि–जॉइनिंग करण्याबाबत अधिकाऱ्यांना आदेशित करावे, नसता दि.०२ जुलै २०२५ पासून बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा ट्रेनी शिक्षक संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष, जिल्हाउपाध्यक्ष, तालुकाध्यक्ष व आदि पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# लिंबागणेश येथील गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागणार ; अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग रवींद्र तोंडे, वाहतूक शाखा प्रमुख सुभाष सानप यांनी केली पाहणी :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२६) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावरील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या अपघातप्रवण क्षेत्रात गतिरोधक बसवावेत या मागणीसाठी गेल्या ३-४ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार पुकारलेल्या आंदोलनाची प्रशासनाकडून अखेर दखल घेण्यात आली असुन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्हा सुरक्षा रस्ता समि तीत हा विषय घेतल्यामुळे त्यांच्या आदेशाने आज दि.२६ गुरुवार रोजी सकाळी अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे आणि वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी लिंबागणेश येथे पाहणी केली. यावेळी डॉ.गणेश ढवळे, हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद उपस्थित होते. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे,वाहतुक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी प्रत्यक्ष पाहणी करत संवाद साधत, सुचना फलक लावण्याच्या सुचना देत संबंधित कंत्राटदार आणि राष्ट्रीय महामार्ग आधिका–यांना लेखी पत्रकाद्वारे कळिवण्यात येणार असल्याचे सांगितले.

डॉ.गणेश ढवळे आणि हरिओम क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

गेल्या ३-४ वर्षांपासून डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रास्तारोको, अपघातातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली आदी लक्ष्यवेधी आंदोलने करण्यात आली होती.तर. ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी दि.१६ जुन रोजी आत्मदहनाचा इशारा दिल्यानंतर कंत्राटदाराने तात्पुरता स्वरूपात रंबलिंग स्ट्रीप मारून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला होता.मात्र हरिओम क्षीरसागर यांनी त्याचा फारसा परिणाम होत नसल्याने गतिरोधकाची मागणी लावून धरत दि.२५ जुन रोजी ङ्गआम दार आपल्या गावी, आपल्या दारीङ्कविशेष मोहिमेंतर्गत आ. संदिप क्षीरसागर यांच्या कार्यक्रमात बेलगाव याठिकाणी गतिरोधकाचा मुद्दा लावून धरत पाठपुरावा केला.अखेर आज वरीष्ठ आधिका–यांनी पाहणी करत सकारात्म कता दर्शवली त्यामुळे गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.




दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २७ जून २०२५
https://lokaarambh.com



# ढाकात दुर्गादेवी मंदिरातील तोड फोडीनंतर भारत संतापला, मोहम्मद युनूस सरकारला कठोर शब्दांत फटकारले

बांगलादेशात शेख हसीना यांची सत्ता गेल्यानंतर अल्पसंख्याकांवर सातत्याने हल्ले होत आहेत. मंदिर, चर्चमध्ये तोडफोड केली जात आहे. मोहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारच्या काळात बांगलादेशातील अल्पसंख्याक असुरक्षित बनले आहेत. राजधानी ढाका येथे दुर्गा मंदिराची तोडफोड करण्यात आली. भारताने या घटनेवर तीव्र निषेध नोंदवला. भारताने बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेबद्दल आणि धार्मिक स्थळांच्या संरक्षणाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. हल्ले रोखण्यात सरकार अपयशी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, हिंदू समुदाय आणि धार्मिक स्थळांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही बांगलादेशच्या अंतरिम सरकारची जबाबदारी आहे. भारत बांगलादेशसोबत सर्व मुद्द्यांवर शांततापूर्ण आणि सकारात्मक वातावरणात चर्चा करण्यास तयार आहे. बांगलादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांवर होणारे दडपशाही रोखण्यात अपयशी ठरल्याबद्दल भारताने यापूर्वी अनेक वेळा अंतरिम



सरकारवर टीका केली आहे. सरकारने सुरक्षा दिली नाही ढाका येथील दुर्गा मंदिर पाडल्याबद्दल जयस्वाल यांनी बांगलादेशी अधिकाऱ्यांवर टीका केली. ते म्हणाले, जिहादी लोक ढाका येथील खिल खेत येथील दुर्गा मंदिर पाडण्याचा प्रयत्न करत होते, हे सरकारला माहीत होते. त्यानंतरही मंदिराला सुरक्षा दिली नाही. उलट अंतरिम सरकारने या घटनेला बेकायदेशीर जमिनीचा वापर केला, असे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. बांगलादेशात या पद्धतीच्या घटना वारंवार घडत आहेत. याबद्दल आम्हाला निराशा आहे. १९९६ च्या गंगा पाणी कराराचे नूतनीकरण करण्यासाठी भारत आणि बांगलादेशमध्ये चर्चा सुरू होणार आहे. हा करार सन २०२६ मध्ये पूर्ण होत आहे. त्याबाबत जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, नवी दिल्ली सर्व बाबींवर ढाकाशी चर्चा करण्यास तयार आहे. दोन्ही पक्षांसाठी चांगल्या चर्चेसाठी अनुकूल वातावरण निर्माण करता येईल. दोन्ही देशांतील गंगा पाणी करारावर १२ डिसेंबर १९९६ रोजी झाला होता. भारताचे तत्कालीन पंतप्रधान एच.डी. देवेगौडा आणि बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी त्यावर स्वाक्षरी केली होती.

## सर्वसामान्यांना लुटर्णाया अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबूब मलिकचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर -ॲड.शेख इमरान खाजा

बीड (प्रतिनिधी)- फ्लॅट, दोन चाकी, चार चाकी वाहन असे आमिष दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली बीडमध्ये सर्वसामान्य नागरिकांना लुटर्णाया अरेबियन ज्वेलर्सचा म ालक महेबूब मलिक यास लाखोंची फसवणूक केल्या प्रकरणी अटकपुर्व जामीन नामंजूर करण्यात आला आहे.याबाबत माहिती अशी की, बीडमध्ये अरेबियन ज्वेलर्स या नावाने सोन्याची दुकान आहे व त्यास महबूब मलिक हा नावाचा व्यक्ती चालवतो. त्याने बीड येथे दुकान चालवत असताना सोन्याची व गाडीची लकी ड्रॉ स्कीम चालवली व बीड शहरातील अनेक सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या मोठ्या



बक्षिसांचे अमित दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्स च्या मालकाने कोट्यावधी रुपये उकळले. व त्यानंतर मागील दोन महिन्यापासून त्याच्या दुकानाचे शटर बंद आहे. शहरातील एक ज्वेलर्स दुकानातून अरेबियन ज्वेलर्स चा मालकाने दिनांक २९. ५. २०२४ रोजी २३ लाख रुपये किमतीचे सोने ग्राहकाला दाखवण्यासाठी नेले याविषयी तक्रारदाराने वारंवार पैसे द्या किंवा सोने परत करा अशी मागणी आरोपीला केली परंतु त्यावेळी त्याने उडवा उडवी चे उत्तरे देऊन फसवणूक केली अशी तक्रार ज्वेलर्स मालकाने(तक्रारदाराने) पोलिसात दिले या प्रकरणी महेबूब मलिक याच्याविरुद्ध कलम ४२०, ४०६ भादवी प्रमाणे शहर पोलीस स्टेशन ला गुन्हा क्र.९३/२०२५ नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपी अरेबियन ज्वेलर्स चा म ालक महबूब मलिक याने मा. सत्र न्यायालय, बीड येथे अटकपूर्व जामीन मिळणे कामे अर्ज दाखल केला होता सदर जामीन अर्जात ॲड.शेख इमरान खाजा इमरान खाजा यांनी आक्षेप घेत न्यायालयासमोर आरोपीने लाखों रुपयांची सर्वसामान्य लोकांची फसवणूक केलेली असल्याबाबत कागदपत्र दाखल करत माननीय न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले व आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली या कायदेशीर बाबी ग्राह्य धरून माननीय न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. यावेळी आक्षेप अर्जदार यांचे वतीने ॲड .शेख इमरान खाजा यांनी न्यायालयीन बाजू मांडली. त्यांना ॲड.पंकज रायबोळे, ॲड.सूर्यकांत पवार, ॲड. शेख अनवर यांनी सहकार्य केले.

## दुचाकीच्या अपघातात तरुणाचा मृत्यु



तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील ३० वर्षीय युवकाचा दुचाकी अपघातात मृत्यु झाल्याची घटना बुधवार (दि. २५) सायंकाळी घडली. संपत शिवाजी राऊत असे मृत युवकाचे नाव आहे. मात्र, या अपघाताला केवळ चुकून घडलेली दुर्घटना मानावे की पूर्वनियोजित घातपात, याबाबत मृताच्या कुटुंबियांनी गंभीर शंका उपस्थित केली आहे. मृत युवकाचे नाव संपत शिवाजी राऊत (३०, रा. चिंचोलीमाळी) असे आहे. बुधवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास तो आपल्या दुचाकीवरून केजकडे जात असताना टाकळी शिवारातील एका वळणावर त्याची दुचाकी रस्त्यालगत असलेल्या झाडाला धडकली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यु झाला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह केज उपजिल्हा रुग्णालयात हलवला. परंतु या मृत्यूमागील पार्श्वभूमी लक्षात घेतली असता, ही केवळ अपघाताची घटना नसून घातपात असावा, असा संशय मृताच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. संपत राऊत याने दोन वर्षांपूर्वी गावातीलच दुसऱ्या समाजातील मुलीसोबत आंतरजातीय विवाह केला होता. या विवाहामुळे त्याचे सासरच्यांशी संबंध तणावपूर्ण होते. बुधवारी दुपारी सासरच्या मंडळींशी त्याचे भांडण झाले होते. त्यानंतर ते केज पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात तक्रार देण्यासाठी निघाले, ही माहिती मिळताच संपत

## एनसी दाखल होताच ४८ तासाच्या आत कारवाई करुन तक्रारदारांचे करणार समाधान

बीड। प्रतिनिधी बीड जिल्हा पोलीस दलाकडून समाधान ४८ ही योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश पोलीस स्टेशनमध्ये दाखल अदखलपात्र (NC) गुन्ह्यांवर ४८ तासांच्या आत त्वरित प्रतिसाद देऊन तक्रारदाराचे समाधान करणे हा आहे. अनेक वेळा अशा गुन्ह्यांमध्ये पोलीसांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने तक्रारदार असमाधानी राहत होते. त्यामुळे खोटे गुन्हे दाखल करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली होती. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी, NC गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी ४८ तासांच्या आत घटनास्थळी भेट देऊन, घटनेची सत्य परिस्थिती जाणून घेऊन तक्रारदारास कायदेशीर मार्गदर्शन केले जाईल. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात पोलिसांचा वावर वाढेल, तसेच छ्उ मधील आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य होईल. परिणामी दखलपात्र गुन्ह्यांना आळा बसेल. ही योजना समाजातील किरकोळ वाद वेळेत सोडवून संभाव्य गंभीर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याचे कार्य करेल. नागरिकांमध्ये पोलीस दलावरील विश्वास वाढवण्यासही ही योजना मोलाची ठरेल.

## स्वातंत्र्य सेनानी का.तात्यासाहेब पोकळे तत्व व निष्ठावान नेते होते-ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे

आष्टी (प्रतिनिधी): आई -वडीलांच्या रुणातुन कधीच कोणीलाच मुक्त होत येत नसते.प्रत्येक धर्म ग्रंथ, पुराण,शास्त्रात आई वडीलांचे महत्व,त्यांचे उपकारच सांगितले आहेत.श्रध्देने केलेले कार्य हे अजरामर राहत असते. कवी,लेखक गायकांनी आईचे वर्णन केलेले आहे मात्र जगतगुरु संत तुकाराम महाराज यांनी ख-या अर्थाने बापाचे वर्णन आपल्या अभंगातुन केलेले आहे.संगोपन (सांभाळणे), संवर्धन (वाढविणे) आणि संक्रमण (संस्कार पुढे देणे) असे काम माणुस करीत असतो.मरण कुणालाच चुकविता येत नसते.मरणाचे स्मरण व देवाचे स्मरण असले की जीवन सुखकर होते.तात्यासाहेब यांनी आपल्या तत्वांशी कधीच तडजोड केली नाही.एक आदर्श जीवन ते जगले. स्वातंत्र्य सेनानी का.तात्यासाहेब पोकळे हे राजकीय,शैक्षणिक,सामाजिक, धार्मिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांच्या निष्ठेला तोड नव्हती. स्वातंत्र्य सेनानी का. तात्यासाहेब पोकळे तत्व व निष्ठावान नेते होते असे प्रतिपादन ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे यांनी केले. आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील भाजपा माजी तालुकाध्यक्ष कल्याण पोकळे यांचे वडील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक का.तात्यासाहेब पोकळे यांच्या दशक्रियाविधीनिमित्त आयोजित शोकसभेत ते प्रवचन सेवेत बोलत होते. यावेळी भाजपाचे आ.सुरेश धस म्हणाले की,तात्यासाहेब पोकळे यांनी आयुष्यभर डाव्या विचार सरणीची कास धरून अपुर्ण साधनांसह आपल्या कष्टाने आणि मेहनतीने कम्युनिस्ट विचार तळागाळात पोहोचविला. अन्यायाविरोधात अनेक मोर्चे,आंदोलने उभारत त्यांना न्यायाची भूमिका मांडली.प्रामाणिकपणे जनतेची सेवा केली.गावचे उपसरपंच ते पंचायत समिती सदस्य या पदांवर त्यांनी लोकांसाठी कार्य केले.त्यांच्या कार्याची परंपरा त्यांचे सुपुत्र कल्याण पोकळे यांनीही लहानपणापासूनच संघटनात्मक कामात सक्रिय राहून पुढ` चालवली.वडिलांची सेवा करत त्यांनी तरुणांसमोर कर्तव्यनिष्ठेचा आदर्श उभा केला आहे असे सांगितले. माजी आ.भीमसेन धोंडे म्हणाले की, स्वातंत्र्य सेनानी का. तात्यासाहेब पोकळे हे कम्युनिस्ट विचारात जगले.पंचायत समिती सदस्य असताना त्यांना आपण पाठींबा दिला होता.त्यांचा आमच्याशी खुप स्नेह होता.त्यांना ९८ वर्षाचे आयुष्य लाभले. कल्याण पोकळे देखील समाजाची सेवा करत आहे.तात्यासाहेबांच्या पाठीमागे लोकांच्या कामात कल्याण असतो.माजी आ.साहेबराव दरेकर म्हणाले की,कम्युनिस्ट पक्ष हा वारकरी,पैशाला कधीच किंमत देत

# उमाकिरण ओम क्लासेसमधील शिक्षकासह शाळा संस्थाचालकावर अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा आरोप; POCSO अंतर्गत गुन्हा दाखल

बीड (प्रतिनिधी): बीड शहरातील उमाकिरण ओम कोचिंग क्लासेस मधील शिक्षक, तसेच श्री.संत ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल चा संस्थाचालक असलेल्या प्राध्यापक विजय पवार याच्यावर आणि दुसऱ्या शिक्षक प्रशांत खटावकर याच्यावर अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे POCSO कायदा आणि भारतीय दंडविधानाच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**राजकीय क्षेत्रातही सक्रीय शिक्षक:** विजय पवार हा केवळ शिक्षकच नसून, स्थानिक राजकीय घडामोडींमध्ये सक्रिय सहभाग ठेवत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाला अधिक गतीने राजकीय व सामाजिक पातळीवरही प्रतिसाद मिळत असून, अनेक राजकीय मंडळींशी त्याचे संबंध असल्याचे बोलले जात आहे.

**शाळा व कोचिंग क्लासेसमध्ये एकच खळबळ:** विजय पवार श्री.संत ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल या शाळेचा संस्थाचालक देखील असल्याने शिक्षण क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे. शाळा आणि कोचिंग क्लासेसमधील अनेक पालक, विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

**पीडित मुलीची तक्रार व पोलिसांची कारवाई:** पीडित अल्पवयीन मुलीने आपल्या पालकांच्या मदतीने दिलेल्या तक्रारीत,



"शाळा आणि क्लासचे संचालकच जर असा गुन्हा करणार असतील तर पालकांनी विश्वास ठेवायचा तरी कुणावर?" "संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची पारदर्शक चौकशी झाली पाहिजे."

शाळा आणि कोचिंग क्लासेस म्हणजे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह ठिकाण असावे, हीच समाजाची अपेक्षा असते. परंतु सध्या पैसे, सत्ता आणि राजकीय संलग्नता यांच्या जोरावर काही मंडळी शिक्षणसंस्था चालवतात, आणि त्यातूनच अशा दुर्दैवी घटना घडतात. यासाठी शिक्षण खात्याने तसेच स्थानिक प्रशासनाने या संस्था दरवर्षी तपासण्याचा ठोस आणि सक्तीचा कायदा करणे अत्यावश्यक झाले आहे.

शिक्षणाच्या नावाखाली मानसिक छळ व लैंगिक अत्याचार झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. पोलिसांनी तत्काळ तक्रार नोंदवून प्राथमिक तपास सुरू केला आहे. पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, तिचे जबाब नोंदवण्यात आले आहेत.

**POCSO कायद्यानुसार कठोर कारवाई:** POCSO कायदा 2012 अंतर्गत दोष सिद्ध झाल्यास ५ वर्षांपासून आजीवन कारावासापर्यंतची कठोर शिक्षा होऊ शकते. शिवाय या कायद्यांतर्गत आरोपींना जामीन मिळणे कठीण असते.

**शहरात संतापाची लाट, कारवाईची मागणी:** या घटनेनंतर पालक, सामाजिक संस्था आणि विद्यार्थी संघटनांनी संताप व्यक्त करत कठोर कारवाईची मागणी केली आहे. तसेच, अशा घटना रोखण्यासाठी सर्व शाळा व शिकवणी केंद्रांची कडक चौकशी करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com